2014

ISSN 2278-5655

# Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)

(Bi-Monthly)

Peer-Reviewed Journal

Impact factor:0.948

**Chief-Editor**

**Ubale Amol Baban**

PEER-REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

**[Editorial/Head Office: 108, Gokuldham Society, Dr.Ambedkar chowk, Near TV Towar,Badlapur, MSief**

**Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ) (Bi-Monthly)**
Peer-Reviewed Journal Vol No III Issues III
**JUNE-JULY- 2014** **ISSN 2278-5655**

# अहमदनगर जिल्हा परिषदेच्या वतीने राबविलेल्या विद्यावर्धिनी अभियानाचा अभ्यास

***Education***

डॉ. विजय धामणे (सहाय्यक प्राध्यापक),
टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे

## १) प्रास्ताविक

मानवाने आपल्या गरजांनुसार व परिस्थितीनुसार शिक्षणाच्या मदतीने अनेक शोध लावले. कृषी, औद्योगिक, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान अशा कितीतरी क्षेत्रात क्रांती केली. त्यामुळे मानवी जीवन अत्यंत गतीमान व सुकर झाले. शिक्षणामुळे व्यक्ती स्वत:चा, समाजाचा आणि राष्ट्राचा विकास घडवून आणू शकते आणि मानवी विकासाला हातभार लावू शकते.

एकविसाव्या शतकात आपणासमोर अनेक आव्हाने आहेत. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या युगात आपणाला गुणवत्तेशी तडजोड करून चालणार नाही. म्हणजेच आज प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक क्षेत्रात गुणवत्तेला (Quality) खूप महत्त्व आहे. औद्योगिक क्षेत्रात जसे गुणवत्तापूर्ण उत्पादनाला महत्त्व असते, तसेच शिक्षण क्षेत्रातही गुणवत्तापूर्ण शिक्षणाला खूप महत्त्व आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी विविध आयोग, समित्या यांच्या माध्यमातून अनेक शिफारशी केल्या गेल्या. त्याची अंमलबजावणी केली गेली. आजही शालेय व्यवस्थापनात समाजाचा सक्रिय सहभाग घेऊन प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी व शिक्षणात गुणवत्ता आणण्यासाठी सर्वशिक्षण मोहीम राबविली जात आहे याचाच आधार घेऊन अहमदनगर जिल्हा परिषदेच्या वतीने प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यावर्धिनी अभियान राबविले. या अभियानाचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे.

**२) संशोधनाची गरज**

शिक्षण क्षेत्रात TQM 'समग्र गुणवत्ता व्यवस्थापनाचा' विचार रूजू लागलेला आहे. यात शिक्षक विद्यार्थी यांच्या गुणवत्तेला खूप महत्त्व आहे. शिक्षण महाविद्यालयात काम करत असताना अनेक वेळा मन खिन्न होते. लेखनातली शुध्दता, बोलण्यातला अस्खलीतपणा गेला कुठे ?

बी.एड्. च्या विद्यार्थ्यांना संख्याशास्त्रातील मूलभूत गणिती क्रिया माहिती नसणे ही अत्यंत खेदाची बाब वाटते. पदवी स्तरावर या उणिवा नक्कीच अपेक्षित नाहीत. मातृभाषेतील लेखन, संभाषणातील कौशल्ये आणि व्यावहारिक गणितातील मूलभूत कौशल्यांचा विकास विद्यार्थी - शिक्षकांत किंवा पदवीधारकांत झालेला नसेल तर तो पुढील पिढीत कसा संक्रमित होणार ?

या प्रश्नांची उकल होण्यासाठी साहजिकच संशोधकाला मूलभूत स्तरावरील गुणवत्ता महत्त्वाची वाटते. प्राथमिक स्तरावर जर भाषा, गणिताची मूलभूत कौशल्ये संपादली गेली तर आपोआपच पुढील स्तरावर ही गुणवत्ता आणखी सुधारेल आणि आपल्याला अपेक्षित फळ मिळेल. या हेतूने प्रस्तुत संशोधन गरजेचे वाटले. गणिताचाही व्यवहारात वापर झाला तरच खऱ्या अर्थाने 'जीवन आणि शिक्षण' यांचा संबंध असल्यासारखे

वाटेल ! याकरिता भाषा व गणिताचा व्यवहारात प्रभावी वापर करता येण्याच्या हेतूने प्रस्तुत संशोधन गरजेचे वाटले.

आज भाषेची जी अवस्था तीच गणिताबाबत ! व्यावहारिक पातळीवर जास्तीत जास्त लोक गणिती किंवा सांख्यिकी माहितीबाबत कमी पडतात. मूलभूत गणिती क्रिया, दशांश, शतांश, सहस्त्रांश किंवा अपूर्णांक अशा कितीतरी बाबी अनभिज्ञ ! जर या मूलभूत कौशल्यांपासून व क्षमतांपासून विद्यार्थी दूर असेल तर त्याने घेतलेले शिक्षण शून्य मोलाचे. भाषा व गणितातील सद्य:स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने उपाययोजना माहीत करून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे वाटले.

**३) प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व**

१) प्रस्तुत संशोधनाद्वारे प्राथमिक स्तरावर भाषा व गणित विषयातील क्षमता संपादनामध्ये योग्य उपचार करण्याची पद्धती समजली यातून शिक्षकांना एक निदानात्मक दृष्टीकोन मिळाला.

२) प्रस्तुत संशोधनाद्वारे शिक्षणात लोकसहभागाचा परिणाम अभ्यासता आला. गुणवत्ता सुधार सारख्या प्रकल्पात पालकांची किंवा समाजाची भूमिका कोणती याचा अभ्यास करता आला. औपचारिक शिक्षणात लोकसहभागाचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरेल.

३) विद्यावर्धिनी अभियानाच्या अभ्यासामुळे दीर्घकाळ राबविलेल्या प्रकल्पाची विद्यार्थी, शिक्षक किंवा इतर घटकांवरील परिणामकारकता अभ्यासता आली. भविष्यात अशा दीर्घकाळ राबविल्या जाणाऱ्या उपक्रमासाठी प्रस्तुत संशोधन हे सर्वांनाच मार्गदर्शक ठरणार आहे.

४) सातत्यपूर्ण मूल्यमापन व उपचारात्मक अध्यापन यांवर गुणवत्ता सुधार निश्चितच अवलंबून असतो हे प्रस्तुत संशोधनाचे फलित इतर विषयांच्या संदर्भातही महत्त्वपूर्ण आहे. शिक्षकांना यातून गुणवत्ता सुधार करण्यासाठी योग्य दिशा मिळणार आहे.

**Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ) (Bi-Monthly)**
Peer-Reviewed Journal Vol No III Issues III
**JUNE-JULY- 2014 ISSN 2278-5655**

५) सातत्यपूर्ण मूल्यमापनासंदर्भात शिक्षक व विद्यार्थी यांचा दृष्टीकोन सकारात्मक करण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेविषयीची भीती कमी करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाद्वारे केलेले मूल्यमापन महत्त्वाचे वाटते.

६) प्रस्तुत अभ्यासामुळे जिल्हा परिषदेने राबविलेल्या प्रकल्पावर प्रकाश टाकला गेला. यातून प्रत्येकाला प्रेरणा मिळेल व स्थानिक पातळीवर आपणही गुणवत्तेसाठी प्रयत्न करायला हवेत हा विचार वाढीस लागेल. गुणवत्ता सुधार ही एक सामुहिक जबाबदारी आहे. हा विचार दृढ होण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरेल.

७) विद्यावर्धिनी अभियानात सर्वसमावेशकतेचे तत्त्व अवलंबण्यात आले होते. भाषा व गणित विषयातील मूलभूत क्षमतांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन व उपचारात्मक अध्यापनातून संपादन अशा तत्त्वांच्या परिणामांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केलेला आहे. प्राथमिक स्तरावरील शिक्षणात या बाबींचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भविष्यात हे सर्वांना दिशादर्शक म्हणून महत्त्वाचे वाटते.

**४) समस्या विधान**

**'प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी अहमदनगर जिल्हा परिषदेच्या वतीने राबविलेल्या विद्यावर्धिनी अभियानाचा अभ्यास करणे.'**

**५) कार्यात्मक व्याख्या**

- **प्राथमिक शिक्षणाचा दर्जा**

अहमदनगर जिल्हा परिषद अंतर्गत वय वर्ष ६ ते १० दरम्यान शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा भाषा व गणित विषयातील मूलभूत क्षमतांचा दर्जा

- **अहमदनगर जिल्हा परिषद**

अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणारी व प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी घेणारी जिल्हा पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्था.

- **विद्यावर्धिनी अभियान**

इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांमध्ये भाषा व गणित विषयातील किमान मूलभूत क्षमता पूर्णत: प्राप्त होण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी अहमदनगर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने (२००२-२००४) राबविलेला गुणवत्ता सुधार उपक्रम म्हणजेच विद्यावर्धिनी अभियान होय.

**६) संशोधनाची उद्दिष्टे**

१) विद्यावर्धिनी अभियानाची कार्यपध्दती अभ्यासणे.

२) विद्यावर्धिनी अभियानासंदर्भात शिक्षक व प्रशासनाची भूमिका अभ्यासणे.

३) विद्यावर्धिनी अभियानासंदर्भात लोकसहभागाचा अभ्यास करणे.

४) अभियानामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर झालेला परिणाम अभ्यासणे.

**७) संशोधनाची गृहितके**

१) अहमदनगर जिल्हा परिषदेने प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी २००२-०३ ते २००४-०५ या कालावधीत विद्यावर्धिनी अभियान हे शासकीय अभियान राबविले होते.

२) या विद्यावर्धिनी अभियानातून प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावणे अपेक्षित होते.

**८) व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा**

➢ **व्याप्ती**

प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक शाळांचा दर्जा उंचावण्याकरिता राबविलेल्या अभियानाच्या परिणामकारकतेशी संबंधित आहे.

➢ **मर्यादा**

१) प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष माहितीच्या स्त्रोतांकडून आलेल्या माहितीच्या आधारावर अवलंबून आहेत.

२) या संशोधनात माहिती संकलनासाठी वापरलेली साधने संशोधकाने स्वत: विकसित केलेली आहेत.

➢ **परिमर्यादा**

१) प्रस्तुत संशोधन हे अहमदनगर जिल्हा परिषदेने प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी राबविलेल्या विद्यावर्धिनी अभियानाच्या परिणामकारकतेशी निगडीत आहे.

२) अहमदनगर जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या प्राथमिक शाळांच्या गुणवत्ता विकासाशी प्रस्तुत संशोधन संबंधित आहे.

३) सदर संशोधन हे अहमदनगर जिल्हा परिषदेच्या इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतचे विद्यार्थी, शिक्षक यांच्याशी निगडीत आहे. .

४) प्रस्तुत संशोधन हे भाषा विषयातील वाचन व लेखन आणि गणित विषयातील अंकज्ञान व आकडेमोड या मूलभूत क्षमतांशी संबंधित आहे.

**९) प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण**

प्रस्तुत संशोधनात विद्यावर्धिनी अभियान या गुणवत्तासुधार अभियानाचा अभ्यास करण्यात आला. हा अभ्यास करताना त्याचे स्वरूप, कार्यपद्धती व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीस झालेला फायदा तसेच

शिक्षकांच्या गुणवत्तावाढीचा विचार व समाजाचे योगदान इत्यादी मुद्दांवर भर देण्यात आला होता. गुणवत्ता सुधारण्यासाठी राबविलेल्या एखाद्या प्रकल्पाचा, अभियानाचा किंवा उपक्रमाचा अभ्यास हा विरळच आढळला, ते प्रस्तुत संशोधनातून साध्य केले. हा अभ्यास करताना गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षक, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी या सर्वांची भूमिका अभ्यासली या प्रत्येक घटकावर या निमित्ताने प्रकाश टाकता आला.

या विद्यावर्धिनी कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांचे भाषा व गणित या विषयांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन केले गेले. त्यासाठी विशेष चाचण्यांचा वापर करण्यात आला. त्याव्दारे मूलभूत क्षमता प्राप्त न करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांचे निदान करण्यात आले आणि त्यांच्यासाठी स्वतंत्र उपचारात्मक अध्यापन कार्यक्रम राबविण्यात आला. त्यांना इतर विद्यार्थ्यांबरोबर एकाच पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला गेला. अशा प्रकारे १०० टक्के विद्यार्थ्यांना १०० टक्के किमान मूलभूत क्षमता आत्मसात करण्यासाठी विद्यावर्धिनी अभियान राबविण्यात आले.

प्रस्तुत अभियान व संशोधन हे पुढील तत्त्वावर आधारित आहे.

- **सर्वसमावेशकतेचे तत्त्व**

प्रस्तुत विद्यावर्धिनी अभियान हे अहमदनगर जिल्ह्यातील इ. १ ली ते ४ थी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी राबविले गेले. यात लिंगभेद, सामाजिक भेद, आर्थिक भेद असा कोणताही भेद केला नव्हता. सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी यांना सामावून घेण्यात आले होते. प्रस्तुत संशोधनातून सर्वसमावेशकतेचा परिणाम अभ्यासता आला. जो पूर्व संशोधनात अभावानेच आढळला.

- **सातत्यपूर्ण मूल्यमापनाचे तत्त्व**

विद्यार्थ्यांची भाषा व गणित विषयातील निदानात्मक व संपादणुकीचे मूल्यमापन करण्यासाठी महिन्यातून दोनदा चाचणी घेण्यात येत होती. सातत्यपूर्ण मूल्यमापनाचे तत्त्व वापरून सलग तीन शैक्षणिक वर्षे विद्यार्थ्यांच्या संपादणुकीचे मूल्यमापन करण्यात येत होते. गुणवत्ता विकासासाठी हे अत्यंत मूलभूत तत्त्व होते.

- **उपचारात्मक अध्यापनाचे तत्त्व**

मूल्यमापनातून अप्रगत विद्यार्थ्यांसाठी मूलभूत क्षमता संपादनासाठी प्रभावी उपचारात्मक अध्यापनाचे तत्त्व वापरून सर्व अप्रगतांना मूलभूत क्षमतांवर प्रभुत्व निर्माण करण्यासाठी गरजेवर आधारित उपचार केले गेले.

**१०) संशोधनाची कार्यपध्दती**

- **संशोधन पध्दती**

हा सद्य:स्थितीतील अभ्यास असल्यामुळे तसेच संशोधन समस्येचे स्वरूप, उद्दिष्टे, माहितीचे स्वरूप लक्षात घेता संशोधनासाठी वर्णनात्मक पध्दतीतील **'सर्वेक्षण पध्दती'** वापरली.

- **जनसंख्या व नमुना**

▪ **जनसंख्या** - विद्यावर्धिनी अभियान राबविलेल्या अहमदनगर जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या २९४२ प्राथमिक शाळांचा जनसंख्येत समावेश होता तसेच या शाळांतील ११,१८० शिक्षक, जिल्ह्यातील २४६ केंद्रप्रमुख, १४ गटशिक्षणअधिकारी, २ उपशिक्षणाधिकारी, १ जिल्हा कक्ष अधिकारी, १ शिक्षणाधिकारी यांचा प्रस्तुत संशोधनात जनसंख्या म्हणून समावेश होता.

**Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ) (Bi-Monthly)**
Peer-Reviewed Journal Vol No III Issues III
**JUNE-JULY- 2014 ISSN 2278-5655**

- **नमुना निवड**

**अ) शाळांची निवड**

प्रस्तुत संशोधनासाठी अहमदनगर जिल्हा परिषद अंतर्गत एकूण २९४२ शाळांमधून प्रत्येक तालुक्यातील १० टक्के शाळांची संभाव्यतेवर आधारित सुगम यादृच्छिक न्यादर्शन पध्दतीनुसार निवड केली. यादीत असणाऱ्या शाळांची क्रमबध्द नमुना निवड पध्दतीनुसार निवड केली. अशा प्रकारे २९४२ शाळांपैकी २९७ शाळांचा नमुन्यामध्ये समावेश करण्यात आला.

**ब) शिक्षकांची निवड**

निवडलेल्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते चौथीच्या ज्या वर्गांना एकपेक्षा जास्त तुकड्या होत्या तिथे सुगम यादृच्छिक पध्दतीने शिक्षकांची निवड केली व ज्या इयत्तांचे एकेक वर्ग होते. त्या वर्गांच्या संबंधित शिक्षकांची नमुना म्हणून निवड केली. अशा प्रकारे १० टक्के शाळांतील ११८८ शिक्षकांची नमुना म्हणून निवड केली. परंतु ९१८ शिक्षकांनी प्रश्नावल्या पूर्णत: व्यवस्थित भरून दिल्याने अंतिम नमुन्यात ९१८ शिक्षकांचा समावेश होतो.

**क) केंद्रप्रमुखांची निवड**

अहमदनगर जिल्ह्यातील केंद्रप्रमुखांमधून (२४६) प्रत्येक तालुक्यातील २० टक्के केंद्रप्रमुखांची सुगम यादृच्छिक पध्दतीनुसार नमुना म्हणून निवड केली. हा नमुना निवडताना लॉटरी पध्दत वापरली.

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ) (Bi-Monthly)
Peer-Reviewed Journal Vol No III Issues III
JUNE-JULY- 2014 ISSN 2278-5655

**कोष्टक क्रमांक १**

**तालुकानिहाय शाळा, शिक्षक व केंद्रप्रमुखांची नमुना निवड**

| | शाळा | | शिक्षक | | केंद्रप्रमुख | |
|---|---|---|---|---|---|---|
| तालुका | एकूण शाळा | नमुना | एकूण शिक्षक | नमुना | एकूण केंद्रप्रमुख | नमुना |
| अकोले | ३१५ | ३२ | ११९७ | १२८ | ३३ | ०७ |
| संगमनेर | ३०९ | ३१ | १२०१ | १२४ | २५ | ०५ |
| कोपरगाव | १३७ | १४ | ५९९ | ५६ | १० | ०२ |
| राहाता | १३७ | १४ | ६१० | ५६ | १२ | ०२ |
| श्रीरामपूर | १०६ | ११ | ४०९ | ४४ | ०८ | ०२ |
| आहुरी | १८२ | १८ | ६७६ | ७२ | १४ | ०३ |
| नेवासा | २१७ | २२ | ९५३ | ८८ | १९ | ०४ |
| शेवगाव | १७६ | १८ | ६५४ | ७२ | १७ | ०३ |
| पाथर्डी | २३२ | २३ | ८४५ | ९२ | १८ | ०४ |
| जामखेड | १४० | १४ | ४९४ | ५६ | ११ | ०२ |
| कर्जत | १९९ | २० | ७०९ | ८० | १५ | ०३ |
| श्रीगोंदा | २९४ | ३० | १०२९ | १२० | २४ | ०५ |
| पारनेर | २९७ | ३० | ९४५ | १२० | २३ | ०५ |
| नगर | १९८ | २० | ९३९ | ८० | १६ | ०३ |
| एकूण | २९४२ | २९७ | ११९८० | ११८८ | २४६ | ५० |

**Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ) (Bi-Monthly)**
Peer-Reviewed Journal Vol No III Issues III
**JUNE-JULY- 2014** **ISSN 2278-5655**

**ड) अधिकाऱ्यांची निवड**

अहमदनगर जिल्ह्यातील उपलब्ध सर्वच प्रशासकीय अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यात १२ गटशिक्षणाधिकारी, २ उपशिक्षणाधिकारी, १ कक्षाधिकारी व १ शिक्षणाधिकारी यांचा समावेश केला होता.

- **माहिती संकलनाची साधने**

अभियानासंदर्भात माहिती मिळविण्यासाठी शिक्षक, केंद्रप्रमुख व गटशिक्षणाधिकारी यांच्यासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी व अभियान कक्ष अधिकारी यांच्या मुलाखती घेण्यासाठी मुलाखत सूचीचा वापर केला.

**११)निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधन अभ्यासात शिक्षक प्रश्नावली, पर्यवेक्षकीय यंत्रणेसाठी प्रश्नावली तसेच अधिकाऱ्यांच्या मुलाखती व विद्यावर्धिनी अभियानाचे प्रगतीदर्शक अहवाल इ. माध्यमातून माहिती संकलित केली व त्याचे विश्लेषण करून जे निष्कर्ष निघाले ते वर्गीकृत करून पुढे दिले आहेत.

**१) विद्यावर्धिनी अभियानाची कार्यपध्दती**

इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना भाषेतील वाचन व लेखन व गणितातील अंकज्ञान व आकडेमोड या क्षमता संपादनातील अडथळ्यांचा निदानात्मक चाचणीव्दारे शोध घेतला. चाचणीच्या आधारे अपेक्षित उद्दिष्टांपर्यंत न पोहचणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गरजेनुसार वैयक्तिक मार्गदर्शनाव्दारे, विद्यार्थ्यांचे स्वतंत्र गट करून तसेच प्रभावी शैक्षणिक साधनांव्दारे उपचारात्मक कार्यक्रम राबविले. उपचारात्मक कार्यक्रमाचा परिणाम तपासण्यासाठी प्रत्येक १५ दिवसानंतर अप्रगत विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले जात होते. क्षमतांच्या पुढच्या टप्प्यात अशाच प्रकारची कार्यवाही केली गेली; म्हणजेच मूलभूत क्षमता संपादनाच्या

प्रत्येक टप्प्यावर मूल्यमापन - उपचार - मूल्यमापन अशाच स्वरूपात कार्यवाही केली गेली. या संपूर्ण कार्यवाहीची व फलश्रुतीची नोंद अहवाल स्वरूपात शाळा, गट, तालुका व जिल्हा पातळीवर ठेवण्यात येत होती.

**२) शिक्षक व प्रशासनाची भूमिका**

अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रशासनाने कार्यपध्दती निश्चित करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली या कार्यवाहीसाठी आवश्यक ती शैक्षणिक सामग्री संपूर्ण जिल्हाभर वेळेत पोहचण्यासाठी उपशिक्षणाधिकारी - कक्षाधिकारी - गटशिक्षणाधिकारी - विस्ताराधिकारी व केंद्रप्रमुख यांनी एकमेकांत उत्तम समन्वय राखल्याचे प्रस्तुत संशोधनातून आढळले. अभियान काळात शिक्षकांच्या अध्यापन कार्याचे मूल्यमापन प्रशासनाकडून होत होते. त्याव्दारे शिक्षकांच्या कार्यावर प्रशासनाचा अंकुश होता. याशिवाय विद्यार्थी व शिक्षकांच्या उल्लेखनीय कामगिरीचे अभिनंदन करून प्रोत्साहन दिले तसेच गरजेनुसार मार्गदर्शनही केले. यावरून प्रशासकांनी प्रशासक, पर्यवेक्षक, समन्वयक व मार्गदर्शकाची भूमिका प्रभावीपणे पार पाडल्याचे लक्षात येते.

दैनंदिन अध्यापनाबरोबरच अभियानाची प्रभावी कार्यवाही अशी दुहेरी भूमिका शिक्षकांनी पार पाडली. अभियानाची संपूर्ण अंमलबजावणी शिक्षकांनीच केली; त्यामुळे प्रत्यक्ष कार्यवाहकाची भूमिका शिक्षकांनी पार पाडली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्तिगत मार्गदर्शनाबरोबरच त्यांच्यात आत्मविश्वास व परस्पर विश्वास निर्माण करण्याचे कार्य शिक्षकांनी केले आहे. त्यामुळे विद्यार्थी व शिक्षकांत जवळीकता निर्माण झाली. म्हणजेच शिक्षक पालकांच्या भूमिकेतून कार्य करत असल्याचे प्रस्तुत संशोधनातून आढळले. अभियानकाळात प्रशासक व शिक्षक यांनी आपल्या भूमिका सकारात्मकपणे पार पाडल्यामुळेच अभियान यशस्वी झाले असे म्हणावे लागेल.

**३) लोकसहभागाचा अभ्यास**

विद्यावर्धिनी अभियानाच्या माध्यमातून समाजाचा शिक्षणातील सहभाग वाढविण्यासाठी व पालकांमध्ये शिक्षणविषयक जागृती करण्यासाठी ९२.९२% शिक्षकांनी पालक सभांच्या माध्यमातून व ग्रामशिक्षण समितीच्या माध्यमातून प्रयत्न केला. इयत्ता पहिलीच्या १००% शिक्षकांनी पालकसभांद्वारे प्रयत्न केल्याचे प्रस्तुत संशोधनातून स्पष्ट होते. त्यामुळे पालकांमध्ये जागरूकता निर्माण झाल्याचे ७६.०३% शिक्षकांनी मत व्यक्त केले. आपल्या पाल्याविषयी सतर्क राहून त्याच्या प्रगतीविषयी जाणीव निर्माण झाली. त्यातूनच शिक्षक-पालक संबंध दृढ झाल्याचे ९२.५९% शिक्षकांनी व १००% केंद्रप्रमुख व गटशिक्षणाधिकाऱ्यांनी मत व्यक्त केले. शाळेविषयी आस्था व आदर निर्माण झाल्याचे चित्र सर्वत्र दिसत असल्याचे शिक्षकांनी सांगितले.

या सर्व प्रतिसादांवरून विद्यावर्धिनी अभियानाच्या निमित्ताने समाजाचा शिक्षणातील सहभाग वाढविण्याचा प्रयत्न यशस्वी झाला. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी तो अत्यंत स्तुत्य प्रयत्न होता.

**४) अभियानामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर झालेला परिणाम**

विद्यावर्धिनी अभियानाच्या सातत्यपूर्ण मूल्यमापन व उपचारात्मक अध्यापनाच्या विशेष वैशिष्ट्यांमुळे ६७.८६% शिक्षकांच्या मतांनुसार भाषेतील क्षमतांत लक्षणीय सुधारणा झाली. गणितातील मूलभूत क्रियांचे आकलन झाल्याचेही ६५.४७% शिक्षकांनी नमूद केले. या गुणवत्तावाढीस ७०% केंद्रप्रमुख व ६६.६६% गटशिक्षणाधिकाऱ्यांनीही दुजोरा दिलेला आहे.

अभियानाच्या प्रगतीदर्शक अहवालावरून प्रथम वर्षी इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांच्या जुलै २००२ मधील सरासरी गुणांत (५०.४१%) वर्षाखेरीस २४.०२% इतकी लक्षणीय वाढ होऊन विद्यार्थी ७४.४३ इतक्या सरासरी गुणांपर्यंत पोहोचले.

व्दितीय वर्षात इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्यांचे भाषा व गणितातील मूलभूत क्षमता संपादनाचे शेकडा गुण (६३.८६%) वर्षाखेरीस १२.६४ % इतके वाढून ते ७६.५०% इतके झाले. तर अभियानाच्या शेवटच्या वर्षी गुणवत्तेत ३.७९% इतकी वाढ झाली. या अहवालावरून व शिक्षकांच्या मतांनुसार अभियानाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीस निश्चितच फायदा झाल्याचे स्पष्ट होते.

भाषा व गणित विषयातील मूलभूत क्षमतांमध्ये झालेली वाढ ही अभियानाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर झालेला परिणाम दर्शविते. म्हणजेच प्रस्तुत संशोधनाच्या ‘अभियानातून प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावणे अपेक्षित होते’ या गृहितकानुसार अभियानाचा प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी फायदा झाल्याचे स्पष्ट होते.

अभियानाच्या प्रगतीदर्शक अहवालावरून विद्यार्थ्यांची प्रथम वर्षाची ९१.५५% ही सरासरी उपस्थिती व्दितीय वर्षात ९४.४९% इतकी झाली तर तृतीय वर्षात ९५.८९% इतकी आढळली. यावरून अभियानामुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सातत्याने वाढ झालेली लक्षात येते. या सर्व बाबीं विद्यार्थ्यांची गुणवत्ता पर्यायाने प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यास पूरक ठरल्या आहेत.

**१२) प्रस्तुत संशोधन व पूर्व संशोधन यांच्या निष्कर्षांबाबत चर्चा**

प्रस्तुत संशोधनातील विद्यावर्धिनी अभियानाची उद्दिष्टे पूर्ण होण्यासाठी प्रशासन व शिक्षकांच्या पातळीवर सातत्याने प्रयत्न झाल्याचे प्रस्तुत संशोधनातून आढळले. अशाच प्रकारे पुणे महानगरपालिकेच्या

केंद्र प्राथमिक शाळांचा अभ्यास करताना नंदिनी पाटील यांनाही केंद्र प्राथमिक शाळांची उद्दिष्टे केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षकांकडून बऱ्याच प्रमाणात साध्य होताना आढळली.

इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांच्या भाषा व गणित विषयांतील मूलभूत क्षमता संपादनात वाढ होण्यासाठी विद्यावर्धिनी अभियानात निदान - उपचार - मूल्यमापन अशा पध्दतीने अभियान राबविल्याचे आढळले. विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यानुसार मार्गदर्शन केल्याचे आढळले. पूर्व संशोधनातील भूषण पाटील यांच्या संशोधनातही भाषेतील मूलभूत क्षमता कौशल्यातील अध्ययन अडचणी शोधून त्यावर उपचारात्मक प्रयोग केल्याचे आढळले. पटवर्धन यांच्या संशोधनातही मराठी लेखनातील होणाऱ्या चुका व अडचणींचा शोध घेऊन त्यावर उपचारात्मक कार्यक्रम राबविल्याचे आढळले. अशाच प्रकारची कार्यपध्दती (निदान-उपचार-मूल्यमापन) आंध्र प्रदेश सरकारच्या पुढाकाराने राबविलेल्या प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारणा या प्रकल्पात संध्या संगई यांच्या संशोधनपर लेखातून आढळले. यावरून गुणवत्ता सुधार साठी **निदान व उपचार आणि त्याचे मूल्यमापन** अशा प्रकारे कार्यवाही सर्वच प्रकल्पांतून केल्याचे आढळले.

गुणवत्ता सुधार प्रकल्प राबविताना शिक्षक, प्रशासक व पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या तीन घटकांतील समन्वय योग्य प्रकारे राखण्याचा प्रयत्न विद्यावर्धिनी अभियानातून दिसून आला. पुणे महानगरपालिकेच्या केंद्र प्राथमिक शाळांचा अभ्यास करताना केंद्र शाळेतील शिक्षकांकडून गणित व इंग्रजीसाठी मार्गदर्शन मिळत असल्याचे, शिक्षक-पालक भेटीच्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे तसेच गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षकांची विशेष मदत मिळत असल्याचे निष्कर्ष नंदिनी पाटील यांच्या संशोधनातून मिळाले. जोशी यांच्या संशोधनातही विद्यार्थ्यांच्या संपादनात पालक, शिक्षक व साधन स्रोतांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे आढळले. विद्यार्थ्यांच्या संपादनात कौटुंबिक पार्श्वभूमीबरोबरच शिक्षकांचा प्रभाव महत्त्वपूर्ण असल्याचे पटवर्धन यांच्या संशोधनातून लक्षात येते. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी तसेच प्राथमिक

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात शिक्षणाची भूमिका मध्यवर्ती व महत्त्वपूर्ण असल्याचे निष्कर्ष बारपांडा निरूपमा यांच्या संशोधनातील निष्कर्षावरून लक्षात येते. रामधनी यांच्या The Role of community in improving the quality of education in primary schools या संशोधनातही शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी समाजाचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे तसेच शासन व विद्यार्थ्यांचे प्रयत्न महत्त्वपूर्ण असल्याचे आढळले. आंध्रप्रदेश सरकारच्या प्राथमिक शिक्षणाची गुणवत्तासुधारणा प्रकल्पातही शिक्षक व मुख्याध्यापकांचा सकारात्मक दृष्टीकोन असल्याचे आढळले. यावरून प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक व प्रशासक यांबरोबरच पालकांची (समाजाची) भूमिका महत्त्वाची आहे. या सर्वांमधील समन्वय आणि एकजुटीचा प्रयत्न महत्त्वाचा आहे. सामाजिक गतिमानता व लोकसहभागाशिवाय प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता अशक्य आहे. प्राप्त साधनसामग्रीचा योग्य वापर करून घेण्यासाठी लोकसहभाग आवश्यक आहे. ग्रामशिक्षण समिती अधिक प्रभावीपणे कार्यरत होण्यासाठी सर्वच स्तरांवर प्रयत्न आवश्यक आहेत.

अभियानाचा विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी निश्चित फायदा झाला असे प्रस्तुत संशोधनातून आढळले. गुणवत्तावाढीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रमांचा वापर प्रभावी ठरतो असे निष्कर्ष भूषण पाटील यांच्या संशोधनातूनही मिळाले. त्यांनी मराठी भाषेतील मूलभूत क्षमता कौशल्यांमधील अध्ययन अडचणीवर स्मरण प्रशिक्षण प्रतिमानाचा वापर करून उपचारात्मक मदत केली. विद्या जाधव यांनीही विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमता संपादनात येणाऱ्या अडचणीवर उपचारात्मक कार्यक्रमांद्वारे गुणवत्तासुधार घडवून आणला. पटवर्धन यांनी केलेल्या संशोधनातही इयत्ता ६ वी च्या विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील होणाऱ्या चुका व येणाऱ्या अडचणींसाठी उपचारात्मक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल झाल्याचे लक्षात आले. सातत्यपूर्ण मूल्यमापनाच्या विद्यावर्धिनी अभियानाच्या खास वैशिष्ट्यामुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढ झाल्याचे

आढळले. अशाच प्रकारे सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापनाच्या पुष्पांजली पानी यांच्या संशोधनात गणित, भाषा व पर्यावरण शास्त्र या शालेय विषयांबरोबरच विद्यार्थ्यांचा नियमितपणा, शिस्त, स्वच्छता तसेच सहशैक्षणिक बाबींवर लक्षणीय फरक झाल्याचे आढळले. अशाच प्रकारचे निष्कर्ष संगिता वरूटे व आंध्र प्रदेश सरकारने राबविलेल्या गुणवत्ता सुधार प्रकल्पातून आढळले.

अभियानामुळे शिक्षकांना स्वयंमूल्यमापन तसेच स्वत:ची कार्यक्षमता वाढविण्याची संधी मिळाली तसेच निदानात्मक दृष्टीकोन मिळाला. एकूणच स्वत:च्या गुणवत्तावाढीस पोषक वातावरण मिळाले. शिक्षकांना लाभलेली दृष्टी ही भविष्यातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी निश्चितच फायदेशीर ठरेल.

**१३) शिफारशी**

प्रस्तुत संशोधनाद्वारे अभियानाची फलश्रुती व जाणवलेल्या त्रुटी लक्षात घेता संशोधकाने शिक्षक, प्रशासन व शासनासाठी काही उपयुक्त अशा शिफारशी केल्या आहेत त्या पुढील प्रमाणे

१) अहमदनगर जिल्हा परिषदेने प्राथमिक शाळेत राबविलेले विद्यावर्धिनी अभियान उपयुक्त व परिणामकारक झाल्यामुळे हे अभियान कायमस्वरूपी राबविले जावे.

२) विद्यावर्धिनी अभियानाची व्याप्ती सर्व जिल्ह्यांमध्ये वाढवावी.

३) विद्यावर्धिनी अभियानात भाषा व गणित या विषयांबरोबरच इतर विषयांचाही समावेश केला जावा.

- शिक्षणात समाजाचा सहभाग टिकवून ठेवण्यासाठी प्रशासनाने काही उपक्रम किंवा योजना राबवाव्यात.

**प्रस्तुत संशोधनाचे शैक्षणिक योगदान**

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात दर्जेदार शिक्षणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी राबविलेल्या योजनांचे मूल्यमापन करण्याकरिता प्रस्तुत संशोधन मार्गदर्शक ठरेल.

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ) (Bi-Monthly)
Peer-Reviewed Journal Vol No III Issues III
JUNE-JULY- 2014 ISSN 2278-5655

- या संशोधनाद्वारे शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी लोकसहभागाचे महत्त्व समजले.
- सातत्यपूर्ण मूल्यमापन व उपचारात्मक अध्यापन यामुळे गुणवत्तेत वाढ होते हे तत्त्व सदर संशोधनामुळे अधोरेखित झाले.
- सातत्यपूर्ण मूल्यमापन व उपचारात्मक अध्यापन या तत्त्वाचा दीर्घकाळ वापर केल्यास गुणवत्ता सुधार चिरस्थायी होतो.
- भाषा व गणित विषयांतील किमान मूलभूत क्षमता वाढविण्यासाठी सर्व समावेशकतेच्या तत्त्वावर आधारित योजनेची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी सदर संशोधनाची उपयुक्तता.
- शासकीय पातळीवरील गुणवत्तासुधार योजनांची परिणामकारकता तपासण्यासाठी दिशादर्शक.
- गुणवत्तासुधार योजनेत शिक्षक व प्रशासनाची भूमिका अभ्यासण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयोगी ठरेल.
- विद्यावर्धिनी अभियानाबरोबरच स्थानिक पातळीवर विविध गुणवत्तासुधार प्रकल्प राबविले गेले. या सर्व प्रकल्पांचे स्वरूप व कार्यपध्दती यांचा विचार करून महाराष्ट्र शासनाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या मदतीने सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम तयार केला व शासन निर्णय क्रमांक - संप्रप २००७/(६५/०७)/प्रा.शि.-५ दिनांक २६ एप्रिल २००७ या निर्णयानुसार त्याची आज राज्यभर अंमलबजावणी होत आहे. शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी व परिणामकारकता तपासण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रस्तुत संशोधन नक्कीच दिशादर्शक असेल.

**संदर्भ**

१) Best, J. W. and Khan, J. V. (2008). *Research in Education* (10th Edition). New Delhi : Prentice Hall.

२) Bhatia, K. K. Chadha, K. S. Kadyan and Sharma, S. (1988). *Modern Indian Education and its problems*. Tandon publication book market.

३) Sixth servey of Educational Research, New Delhi : NCERT.

४) इंदापूरकर, चं. द. (१९८९). *मराठी भाषा व्यवस्था व अध्यापन.* पुणे : कॉन्टीनेंटल प्रकाशन.

५) नरवणे, मीनल (१९९९). *भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या.* पुणे : नूतन प्रकाशन.

६) पंडित, बन्सी बिहारी. (२००८). *शिक्षणातील संशोधन,* पुणे : नित्य नूतन प्रकाशन. भाळवणकर, वा. गो. (२००८). *प्राथमिक शिक्षण : सद्य:स्थिती समस्या व उपाय.* पुणे : सुविचार प्रकाशन.

७) महाराष्ट्रशासन - *शिक्षण व राष्ट्रीय विकास शिफारशींचा सारांश (१९६४-६६).* पुणे : शासकीय मुद्रणालय, महाराष्ट्र शासन.

८) *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - १९८६, शैक्षणिक आव्हानांकडून कृति कार्यक्रमाकडे* . पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.

९) *सर्व शिक्षण मोहीम, अंमलबजावणीचा आराखडा.* मुंबई : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद.

१०) अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शिक्षण विभाग, परिपत्रक क्र. कार्या-३/डीपीईपी/८०१/२००३. दिनांक २०/०६/२००३.

११) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक - पी.आर.ई. - २००१/२७७१/प्रा.शि.-१, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२. दिनांक : २३ डिसेंबर, २००५.